महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
२रा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ०२३.

विषय : पीएलएल व सीएल-१ घटकांनी त्यांच्या ब्रॅण्डचे लेबल्स मंजुरीकरीता ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत.

## परिपत्रक

क्रमांक : एफएलआर११२०/ऑनलाईन लेबल मंजूरी/पाच मुंबई, दि. 23 डिसेंबर, २०२०.

महाराष्ट्र देशी मद्य निर्मिती नियम, १९७३ च्या नियम ६ (२४) आणि महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट अॅण्ड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर नियम, १९६६ च्या नियम १७ (२६) मधील तरतुदीनुसार नुसार राज्यात उत्पादीत होणाऱ्या देशी मद्य व विदेशी मद्यांच्या बाटल्यांवर लावण्यात येणारे लेबल्स सीएल-१ व पीएलएल घटकास त्यांच्या विनंती अर्जानूसार पडताळणी करून वेळोवेळी मंजूर करण्यात येतात. याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संपूर्ण संगणकीकरणाच्या कार्यक्रमांतर्गत सप्लाय चेन मॅनेजमेंटच्या (SCM) भाग म्हणून मद्यांच्या ब्रॅण्डचे लेबल्स ऑनलाईन पध्दतीने मंजूरीबाबत या विभागाने संगणक प्रणाली विकसीत केली आहे. सदर प्रणालीचा साईट अॅड्रेस https://scmexcise.mahaonline.gov.in/Label/ असा आहे. सद्य:स्थितीमध्ये सीएल-१ व पीएलएल घटकाला त्यांच्या ब्रॅण्डचे लेबल्स मंजुरीकरीता वरील संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येईल. या प्रणालीमध्ये तपशीलवार माहिती भरतांना खालीलप्रमाणे काळजी घ्यावी.

१. घटकांकडे Licensee Registration System करीता असलेला लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करून लेबल्स मंजूरीकरीता वरील संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.
२. घटकांनी लॉगीन केल्यानंतर प्रथम Masters मध्ये जाऊन Authorised Person निवडावे. त्यामध्ये वेळोवेळी लेबल्स मंजूरीकरीता अर्ज करणाऱ्या अधिकृत व्यक्तींची संपुर्ण माहिती अद्यावत करणे आवश्यक आहे.
३. घटकाने लेबल्स मंजूरीसाठी अर्ज करण्याकरीता Application Details मध्ये जाऊन New Application Details निवडावे. New Application Details निवडल्यावर अर्ज – Step 1. Label Application, Step 2. Label Detail, Step 3. Dacument Imges व Step 4. MRP Details अशा टप्यामध्ये विभागला आहे.
४. Step 1. Label Application मधील माहिती भरताना Application Type मध्ये नवीन ब्रॅण्डचे लेबल्स असल्यास New Brand हा पर्याय Select करावा, जर यापुर्वी मंजूर केलेला ब्रॅण्ड / लेबल असेल व त्यामध्ये किरकोळ बदल असल्यास Existing Brand हा पर्याय Select

करावा. तसेच Liquor Type मध्ये पीएलएल घटकानी योग्य तो पर्याय निवडावा. तसेच सदर लेबल / ब्रॅण्ड राज्यात / परराज्यात / परदेशात विक्रीसाठी असल्यास त्याप्रमाणे पर्याय निवडावा. तद्नंतर Type मध्ये Civilian / CSD चा अचुक पर्याय निवडावा. तसेच Brand Type मध्ये Whisky, Vodka, Rum, Brandy इ. पैकी अचुक पर्याय निवडावा. Check List मध्ये योग्य ते पर्याय Select करावेत. अर्जाच्या शेवटी घटकातील ज्या कर्मचाऱ्यांना सदर माहिती भरण्यासाठी प्राधिकृत केले आहे, त्यांच्यापैकी जो अर्ज भरत आहे, त्याचे नाव निवडावे. तद्नंतर Save Application Details वर Click केल्यावर घटकाने भरलेली माहिती Save होईल व स्क्रिनवर Application details updated successfully अशा प्रकारचा मॅसेज येईल. त्यांनतर Close या बटनावर Click करावे. जर भरलेली माहिती चुकीची वाटल्यास Cancel बटनावर Click करावे.

५. तद्नंतर Step 2. Label Detail मध्ये घटकाने Size मध्ये योग्य ती Pack Size चा पर्याय निवडावा. Strength मध्ये मद्याची विहीत अल्कोहोलिक तिव्रता यु.पी. मध्ये नमुद करावी. त्यानंतर Barcode मध्ये लेबल्सवरील बारकोड नमुद करावा. त्यानंतर Color Code मध्ये लेबल्सच्या असलेल्या रंगानुसार कलर कोड निवडावा. त्यानंतर Front Image व Back Image मध्ये त्यानुसार लेबल्सची मुळप्रत स्कॅन करून अपलोड करावयाची आहे. त्यानंतर सदरची माहिती Save करावी. जर एखाद्या ब्रॅण्डचे केवळ Front label असेल आणि Back label नसल्यास केवळ Front Image अपलोड करावी व Back Image निरंक सोडावे. लेबल्स अपलोड करतांना लेबल्सची रंगसंगती व लेबल्सवरील सर्व माहिती स्पष्टपणे दिसेल अशा स्वरूपात स्कॅनिंग करण्याची काळजी घ्यावी. यामध्ये घटक त्यांच्या एकाच ब्रॅण्डच्या वेगवेगळया क्षमताचे (Pack Size) लेबल Add करू शकतो. घटकाने Add केलेले सर्व लेबल / ब्रॅण्डची तपशिलवार माहिती Label size List मध्ये बघता येईल. तसेच त्यामध्ये एखाद्या Pack Size च्या लेबलमध्ये Edit / Delete करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे.

६. त्यांनतर घटकाने Back येऊन Step 3. Document Detail वर Click करावे. Document Type मध्ये योग्य तो कागदपत्राचा पर्याय निवडावा, त्यानुसार Upload Image मध्ये सदरची कागदपत्रे अपलोड करावी. त्यानंतर Save Document वर Click करावे. यामध्ये घटकाला आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावयाची सुविधा उपलब्ध करून दिली असून त्यामध्ये विहीत अल्होहोलिक तिव्रतेपेक्षा वेगळया तिव्रतेकरीता लेबल्स असल्यास त्याबाबत दिलेल्या विशेष परवानगीची प्रत, टायअप / लिज करारातंर्गत असल्यास त्यास परवानगी दिलेल्या पत्राची प्रत, न्युट्रल पॅकिंगकरीताचे लेबल असल्यास त्याबाबत दिलेल्या परवानगीची प्रत किंवा इतर अन्य आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. सदरची कागदपत्रे अपलोड करतांना मुळ कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची काळजी घ्यावी.

७. त्यानंतर घटकाने Back येऊन Step 4. MRP Details वर Click करावे. Step 4. MRP Details हे Option केवळ महाराष्ट्राकरीताच्या लेबल्सकरीताच असून परराज्यात किंवा परदेशाकरीताच्या लेबल्सकरीता केवळ Step 1. Label Application, Step 2. Label Detail व Step 3. Dacument Details असे टप्पे असतील.

८. महाराष्ट्राकरीताच्या लेबल्सबाबत Step 4. MRP Details मध्ये घटकाने केवळ निर्मिती मुल्य (Manufacturing Cost) भरून Save MRP वर Click करावे. महाराष्टाकरीताच्या लेबल्ससाठी ही अंतिम Step असून परराज्यात किंवा परदेशाकरीताच्या लेबल्सकरीता Step 3. Dacument Details ही अंतिम Step आहे.

९. अर्जदार त्यांच्या अर्जाची सद्य:स्थिती त्यांच्या लॉगीन मधून Application Details > Search Application Status मध्ये जाऊन जाणून घेऊ शकतो. तसेच आयुक्तांच्या मंजूरीनंतर घटक संबंधीत ब्रॅण्डच्या लेबल मंजुरीचे पत्र डाऊनलोड करू शकतात.

१०. घटकास त्यांच्या प्रत्येक ब्रॅण्डकरीता स्वतंत्र अर्ज करावा लागेल. परंतु एकाच ब्रॅण्डच्या वेगवेगळया क्षमतेकरीता (Pack Size) वेगवेगळे अर्ज करण्याची आवश्यकता नसून Step 2. Label Detail मध्ये त्यांना आवश्यक असलेल्या एकाच ब्रॅण्डची वेगवेगळी क्षमताची क्षमताचे (Pack Size) लेबल Add करू शकतात.

११. नवीन ब्रॅण्डचे लेबल्स इतर घटकाच्या हरकती / आक्षेपाकरीता नियमानुसार १५ दिवस या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रदर्शित केले जातात. ही सुविधा या प्रणालीमध्ये प्रत्येक घटकाला आपल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करून Application Details > Notice Board Details मध्ये उपलब्ध करून दिली आहे. प्रत्येक घटक आपले लॉगीन करून इतर घटकाचे नवीन ब्रॅण्डची लेबल बघू शकतात व ऑनलाईन हरकत / आक्षेप नोंदवु शकतात. नवीन ब्रॅण्डचे लेबल हे केवळ १५ दिवस हरकती / आक्षेपाकरीता Notice Board Details मध्ये उपलब्ध असेल, १५ दिवसानंतर सदरचे लेबल Notice Board Details मधून आपोआप निघून जाईल.

१२. एखाद्या घटकाने ऑनलाईन पध्दतीने आक्षेप नोंदविल्यास याबाबत मा. आयुक्तांकडे सुनावणीची तारीख व वेळ सदर प्रणालीमधून ऑनलाईन पध्दतीने अर्जदार व आक्षेपक घटकास देण्यात येईल. संबंधीतांने दिलेल्या तारीख व वेळेनुसार त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१३. घटकाने महाराष्ट्राकरीता अर्ज Submit केल्यानंतर सदर ब्रॅण्डची एमआरपी दरपत्रक मंजूरीकरीता सदरचे Application संबंधीत जिल्हयांच्या अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे जाईल. संबंधीत जिल्हयांच्या अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी वरील संकेतस्थळावर त्यांना यापुर्वी दिलेल्या युजर आयडी व पासवर्ड चा वापर करून लॉगीन करून एमआरपी मंजूर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारचे लेबल्स अधीक्षक, राऊशु यांनी एमआरपी मंजूर केल्यानंतरच मंजूर करण्यात येतील. त्यामुळे अधीक्षक, राऊशु यांनी वेळोवेळी आपले लॉगीन करून विहीत वेळेत एमआरपी मंजूरीची कार्यवाही पुर्ण होईल, यांची काळजी घ्यावी.

१४. घटकांनी वरीलप्रमाणे लेबल मंजुरीचा ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर १० दिवसाच्या आत संबंधीत ब्रॅण्डचे मुळ लेबल्स प्रमाणित करून देण्याकरीता चार प्रतीमध्ये या कार्यालयास सादर करावेत. सदरचे मुळ लेबल्स सादर करतांना घटकांनी ऑनलाईन पध्दतीने अपलोड केलेलेच लेबल्स मुळ प्रतीमध्ये या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१५. अशाप्रकारे ऑनलाईन पध्दतीने लेबल्स मंजूरीबाबतच्या संगणक प्रणालीमध्ये वेळोवेळी करण्यात आलेले बदल व त्यानुसार अर्ज करण्याची पध्दती याबाबतच्या सविस्तर सुचना वरील संकेतस्थळावर User Manual अंतर्गत वेळोवेळी देण्यात येतील. घटकाने अशाप्रकारे ऑनलाईन पध्दतीने लेबल्स अर्ज करतांना अर्जात संपुर्ण माहिती काळजीपुर्वक भरावी.

सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सीएल-१ व पीएलएल अनुज्ञप्तीधारक व त्यावरील प्रभारी अधिकारी, राऊशु, यांच्या निदर्शनास आणुन द्यावे. तसेच यापुढे मॅन्युअल पध्दतीने लेबल मंजूर केली जाणार नाहीत, ही बाब घटकांच्या निदर्शनास आणुन द्यावी. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी त्वरीत सुरु करावी.

या परिपत्रकाची सर्व अधीक्षकांनी पोहोच द्यावी.

( कांतीलाल उमाप )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व सीएल-१ व पीएलएल घटकावरील प्रभारी अधिकारी, राऊशु.
४. सर्व सीएल-१ व पीएलएल अनुज्ञप्तीधारक.